सामना

# शहापूरच्या चोंढे धबधब्याची पर्यटकांना भुरळ

■ रवींद्र लकडे

डोळखांब, दि. ३ – जिल्ह्यात पावसाला दमदार सुरुवात झाली असल्याने पर्यटकांनादेखील पावसाळी पिकनिकचे वेध लागले आहेत. शहापूरमधील चोंढे धबधबा ओसंडून वाहत असल्याने पर्यटकांना या धबधब्याची भुरळ पडली असून पर्यटकांना धबधब्यावर जाण्याची ओढ लागली आहे. मात्र या धबधब्यावर सुविधा उपलब्ध नसल्याने पर्यटकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

शहापूरपासून फक्त ४० किमी अंतरावर निसर्गरम्य ठिकाणी असलेला चोंढे धबधबा पर्यटकांना पावसाळी सहलीसाठी पर्वणी ठरत आहे. याच धबधब्यावर हनुमानाचे मंदिर असून मंदिराच्या माथ्यावरून फेसाळणारा धबधबा हनुमंताच्या मंदिराला दुग्धाभिषेक करत असल्याचे विलोभनीय दृश्य पाहायला पर्यटक गर्दी करत आहेत. या धबधब्याला शहापूरच नव्हे तर कल्याण, भिवंडी, बदलापूर, मुरबाड, ठाणे आणि मुंबई यासारख्या शहरातून कुटुंबासह आनंद लुटण्यासाठी अनेक पर्यटक येत असतात.



## पर्यटकांनी काळजी घ्यावी

या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात डोंगररांगा असून धबधब्यावर महाकाय दगड असल्याने पावसाच्या प्रवाहाने दगड खाली येण्याची शक्यता आहे. याकरिता लोखंडी जाळी बसविण्याचे प्रस्तावित असून कोणत्याही प्रकारची दुर्घटना होऊ नये यासाठी पर्यटकांनी नियमाचे पालन करावे. या ठिकाणी मद्यपान व धूम्रपान करणे टाळावे, असे आवाहन स्थानिक पोलिसांनी केले आहे.

Mumbai Edition
Jul 4, 2023 Page No. 6
Powered by : eReleGo.com